Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक १४१ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

**कौशल्य विकास प्रशिक्षणातून रोजगाराची संधी; युवक-युवतींनी लाभ घेण्याचे आवाहन**



(पान २ वर)

## आधी महाजनांचा टोमणा, नंतर भुजबळांची सव्याज परतफेड; मुख्यमंत्र्यांसमोरच रंगली टोलेबाजी!

# पालकमंत्रिपदावरून महाजन-भुजबळांमध्ये जुगलबंदी!

## भुजबळांचा महाजनांना चिमटा, फडणवीसांनी जनतेची जाहीर माफी मागत वादावर टाकला पडदा

जन सम्राट टाईम्स

**नाशिक । नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून जलसंपदामंत्री गिरीश महाजन आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्यात गेल्या काही काळापासून सुरू असलेली राजकीय टोलेबाजी शुक्रवारी पुन्हा एकदा पाहायला मिळाली.**

विशेष म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीतच दोन्ही नेत्यांनी एकमेकांना मिश्कील टोले लगावत राजकीय वातावरणात रंग भरला. महाजनांनी केलेल्या टोमण्याला भुजबळांनी पुढील कार्यक्रमात सव्याज उत्तर देत नाशिकच्या रस्त्यांच्या कामावरून महाजनांना चिमटा काढला.सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत शुक्रवारी नाशिकमध्ये 'सिंहस्थ महाकुंभ भक्तिसंगम' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यापूर्वी फडणवीस, भुजबळ आणि महाजन यांच्या उपस्थितीत मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कृषी महाविद्यालयाचे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उपकेंद्राचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान गिरीश



महाजन यांनी पालकमंत्रिपदाच्या मुद्द्यावरून भुजबळांना मिश्कील टोला लगावला. "भुजबळसाहेब, आम्हाला जळगावचे म्हणून बघू नका. मी पालकमंत्री म्हणून काम करतोय. तुम्ही माझ्या कामाकडे बघा. माझ्याकडे बघू नका बरंका भुजबळसाहेब!" असे म्हणत त्यांनी भुजबळांना चिमटा काढला. इतकेच नव्हे, तर "भुजबळसाहेबांचे भाषण आहे की नाही, माहीत नाही; नाही तर ते मला टोमणा मारतील," असेही महाजन म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे उपस्थितांमध्ये हास्याची लाट पसरली. महाजनांच्या टोमण्याची संधी न सोडता छगन भुजबळांनी पुढील कार्यक्रमात सव्याज परतफेड केली. "नाशिकचे रस्ते आज टकाटक झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महिन्यातून एकदा नाशिकला यायला पाहिजे," असा टोला त्यांनी लगावला. मुख्यमंत्री मोटारीने नाशिकला आल्यामुळे रस्त्यांची परिस्थिती सुधारल्याचे सांगत भुजबळ म्हणाले की, "आमच्या व्यथा जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्री मोटारीने नाशिकपर्यंत आले. त्यांचे खूप खूप आभार. जागोजागी पोलिसही आहेत. अजिबात ट्रॅफिक जाम होऊ देत नाहीत." मुख्यमंत्र्यांना दर महिन्याला नाशिकला बोलवत जा, असा मिश्कील सल्लाही त्यांनी दिला. महाजन-भुजबळांच्या टोलेबाजीचा धागा पकडत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिककरांना होत असलेल्या त्रासाची कबुली दिली. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर एकाच वेळी अनेक विकासकामे सुरू असल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. "या त्रासाबद्दल मी नाशिकच्या जनतेची जाहीर क्षमा मागतो," असे सांगत फडणवीस यांनी परिस्थितीबद्दल दिलगिरी व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय पातळीवरील युद्धजन्य परिस्थितीमुळे डांबराचा तुटवडा निर्माण झाल्याने रस्त्यांच्या कामांमध्ये अडथळे आल्याचेही त्यांनी सांगितले.

### "समन्वयाचा अभाव नाही"

रस्त्यांच्या कामांमध्ये अडथळे आले असले तरी प्रशासन आणि संबंधित यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेली विकासकामे पूर्ण करण्यासाठी सरकारकडून आवश्यक प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, मुख्यमंत्री, महाजन आणि भुजबळ यांच्या उपस्थितीत झालेल्या या मिश्कील टोलेबाजीची नाशिकच्या राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

» Selected

### आता देशभर 'या' पनीरवर बंदी येणार?

नागपूर: जर तुम्ही हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये पनीरच्या डिश आवडीने खात असाल तर तुमच्यासाठी ही अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. देशभरात सध्या 'ॲनालॉग पनीर'चा (Analog Paneer) वापर मोठ्या प्रमाणावर वाढला असून त्यामुळे अन्न सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये या बनावट पनीरविरोधात आधीच कडक कारवाई करण्यात आली असून,आता संपूर्ण देशभरात याच्या विक्रीवर आणि वापरावर पूर्ण बंदी घालण्याच्या विचारात केंद्र सरकार आहे. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाचे (FSSAI) मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) राजीत पुन्हानी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ॲनालॉग पनीरचा मुद्दा आता केवळ एका-दुसऱ्या राज्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. त्यामुळे येत्या काळात याच्या वापरावर देशभरात पूर्णपणे बंदी घालण्यासाठी मोठा निर्णय घेतला जाऊ शकतो.

## पूल ओलांडल्यानंतर दोन तासांतच तो वाहून गेला; नेपाळमध्ये ११ विद्यार्थी अडकले!

### मनकामना देवीचे दर्शन घेऊन परतल्यानंतर महापुराचा तडाखा; तीन दिवसांपासून काठमांडूत अडकले

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी:** नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी महापुराने जनजीवन विस्कळीत झाले असून, रस्ते, पूल आणि जलविद्युत प्रकल्पांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीचा फटका नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील ११ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही बसला आहे. हे विद्यार्थी गेल्या तीन दिवसांपासून काठमांडूत अडकून पडले असून, नेपाळमधून महाराष्ट्रात सुखरूप परतण्याची आस त्यांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, मनकामना देवीचे दर्शन घेऊन विद्यार्थी ज्या पुलावरून सुरक्षितपणे गेले होते, तोच पूल अवघ्या दोन तासांनंतर आलेल्या महापुरात वाहून गेला. त्याचबरोबर मुख्य रस्त्याचाही मोठ्या प्रमाणात विध्वंस झाल्याने विद्यार्थ्यांचा परतीचा मार्गच बंद झाला आहे. या घटनेने विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दर्शन घेऊन



परतले अन् काही तासांतच संकट विद्यार्थ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते मनकामना देवीच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपल्यानंतर त्यांनी एका पुलावरून प्रवास केला. त्यावेळी परिस्थिती तुलनेने सामान्य होती. मात्र, पूल ओलांडल्यानंतर अवघ्या दोन तासांतच महापुराचा रौद्रावतार पाहायला मिळाला आणि त्यांनी नुकताच ओलांडलेला पूल पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेला. याच मार्गावरील मुख्य रस्त्याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने वाहतूक विस्कळीत झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील प्रवास करता आला नाही आणि त्यांना काठमांडूतच थांबावे लागले. रस्ते, पूल गाळात; संपर्क व्यवस्थेवरही परिणाम नेपाळमध्ये आलेल्या या भीषण आपत्तीमुळे अनेक भागांतील रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत. काही ठिकाणी रस्ते गाळात गाडले गेले असून, जलविद्युत प्रकल्पांनाही मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी वाहतूक व्यवस्था ठप्प झाल्याने नागरिक तसेच पर्यटक अडचणीत सापडले आहेत. या परिस्थितीत नाशिकचे ११ विद्यार्थीही अडकले असून, त्यांना सुरक्षितपणे भारतात आणण्यासाठी मदतीची आवश्यकता आहे. हॉटेलचा खर्च वाढल्याने आर्थिक कोंडी सहलीचे नियोजित पॅकेज संपल्यामुळे विद्यार्थ्यांसमोर आणखी एक संकट उभे राहिले आहे.

## जातीय आकसापोटी मनोज जरांगेंचं आंदोलन

जन सम्राट टाईम्स



**मुंबई| प्रतिनिधी:** मनोज जरांगे पाटील यांना अंतरवाली सराटी आणि मुंबईत यापैकी कुठेही आंदोलन करुन देऊ नका. पोलिसांनी मंत्रालयातील कोणाचीही वाट बघू नका. या प्रकरणात कायद्यांना आणि धमक्यांना जास्त गांभीर्याने घ्यावे. मनोज जरांगे यांचे हे आंदोलन विशिष्ट राजकीय कारणासाठी होत आहे.

कारण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसहे बिगर मराठा समाजामधील आहेत, असे वक्तव्य ॲडव्होकेट गुणरत्न सदावर्ते यांनी केले. ते शुक्रवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात राजकीय व्यक्ती देखील सक्रिय आहेत.

माजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यासहित मराठा समाजातील इतर नेते यामध्ये सक्रिय आहेत. या आंदोलनाला सत्तेतील आणि सत्तेबाहेरील मराठा समाजाचा थेट पाठिंबा आहे. जातीय आकसापोटी देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले जात आहे. मनोज जरांगे हा एक प्यादा आहे. तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सेवक आहे. जरांगे मुख्यमंत्र्यांच्या घराला टार्गेट करण्याची भाषा करतो तरी एकनाथ शिंदे मूग गिळून गप्प बसले आहेत. फक्त एकनाथ शिंदे नाहीतर सत्तेतील इतर मंत्री विखे-पाटीलही मवाळपणे बोलतात.

विखे-पाटील यांनी कधीच मनोज जरांगे पाटील यांचा निषेध केला नाही, असे गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटले.मराठा भावांना मराठा आरक्षण नको, तर ई डब्ल्यूएस आरक्षण हवे असे मला अनेक कॉल्स येत आहेत. पाटील नावाची पदे संविधानामध्ये मला दिसत नाहीत. गावांमध्ये पाटील अस,तो तो बौद्ध किंवा आदिवासी समाजाचा असू शकतो. मनोज जरांगे म्हणतो की मला पाटील म्हणा. मनोज जरांगे पाटील हा पॉलिटिकल एक्सट्रॉर्शन करणारा माणूस आहे. आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला डिस्टर्ब करण्याची भाषा करत आहे. रेल्वेची पटरी उखडून टाकू, विमानतळ उखडून टाकू असे बरळत आहे. महत्त्वाच्या व्यक्तींच्या घरांना टार्गेट करु, ही त्याची अतिरेकी भाषा आहे. आझाद मैदानाच्या परिसरात अडीचशेपेक्षा जास्त लोक आले तरी हा परिसर डिस्टर्ब होतो, पण मराठा आंदोलनाला चाळीस हजार आंदोलक येतील. त्यामुळे पोलिसांनी गंगाधर काळकुट्टे यांचा अर्ज निकाली काढून याठिकाणी आंदोलनाला परवानगी देऊ नये, अशी मागणी गुणरत्न सदावर्ते यांनी केली.


### गरिबांच्या घराचं स्वप्न होणार साकार!

मुंबई : अत्यल्प उत्पन्न गटातील नागरिकांना हक्काचं आणि परवडणारं घर उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण विभागानं (Housing Department) भंडाऱ्यात 224 फ्लॅट्सची सुसज्ज वसाहत उभारली आहे. मलेशियातील अत्याधुनिक 'माय वन टेक्नॉलॉजी'चा वापर करून उभारलेली ही भंडारापहिलीच बिना विटांची वसाहत आहे. असून सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (Eknath Shinde) यांच्या हस्ते याचं थाटात लोकार्पण होणार आहे. शासनाच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळं भंडाऱ्यातील अल्प उत्पन्न घटकांतील अनेक कुटुंबांचं हक्काच्या, मजबूत आणि अत्याधुनिक घराचं स्वप्न आता प्रत्यक्षात साकार होणार आहे.

## 'सीजेपी'चे आता नाशिककडे लक्ष; दीपके लवकरच नाशिक दौऱ्यावर!

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी:** 'स्कूल ठीक करो' अभियानाच्या माध्यमातून सरकारी शाळांमधील विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्याची तयारी आता नाशिक जिल्ह्यातही सुरू झाली आहे. जिल्ह्यातील सरकारी शाळांचे सर्वसमावेशक ऑडिट करण्याच्या दृष्टीने कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी)चे प्रमुख अभिजीत दीपके लवकरच नाशिक दौऱ्यावर येणार असल्याची माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांशी संबंधित प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडण्यासाठी नाशिकमध्ये झालेल्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. नाशिक येथील शासकीय विश्रामगृहाच्या गार्डन परिसरात




झालेल्या बैठकीत 'स्कूल ठीक करो' अभियानाची जिल्ह्यातील व्याप्ती वाढविणे, सरकारी शाळांमधील उपलब्ध सुविधा, पायाभूत सोयी, विद्यार्थ्यांच्या अडचणी आणि शैक्षणिक वातावरणाचा आढावा घेणे याबाबत चर्चा झाली. सरकारी शाळांचे सर्वसमावेशक ऑडिट नाशिक जिल्ह्यातील सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत का, शाळांच्या इमारतींची स्थिती काय आहे, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, वर्गखोल्या, शैक्षणिक साधने तसेच इतर आवश्यक सुविधांची स्थिती कशी आहे, याची माहिती संकलित करण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक ऑडिट करण्याचा विचार बैठकीत मांडण्यात आला. या माध्यमातून शाळांमधील प्रत्यक्ष परिस्थिती समोर आणून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. अभिजीत दीपके यांच्या दौऱ्याकडे लक्ष 'सीजेपी'चे प्रमुख अभिजीत दीपके यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर अभियान राबविण्यात येत असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. नाशिक जिल्ह्यातही या अभियानाला व्यापक स्वरूप देण्यासाठी दीपके यांच्या आगामी दौऱ्याचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. दीपके यांच्या दौऱ्यादरम्यान सरकारी शाळांना भेटी देऊन तेथील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी, विद्यार्थी व संबंधित घटकांशी संवाद तसेच शाळांच्या समस्यांचे दस्तऐवजीकरण करण्यावर भर दिला जाण्याची शक्यता आहे. जेन-झी वर्गाला जोडण्याची रणनीती विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी जेन-झी (Gen Z) वर्गातील तरुणांना अभियानाशी जोडण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांशी संबंधित प्रश्न मांडण्याच्या विविध पर्यायांवर विचारविनिमय करण्यात आला. दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील सरकारी शाळांच्या स्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याच्या दृष्टीने या अभियानाकडे आता लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## म्हसावद रेल्वे उड्डाणपुलासाठी 45.82 कोटींच्या सुधारित खर्चाला मंजुरी

### निधीअभावी ७० टक्के कामानंतर रखडलेल्या पुलाला मिळणार गती

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव तालुक्यातील म्हसावद येथील बहुप्रतीक्षित रेल्वे उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामाला अखेर गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. निधीअभावी सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर प्रलंबित असलेल्या या पुलासाठी शासनाने ४५ कोटी ८२ लाख रुपयांच्या सुधारित अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पुलाचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधीची अडचण दूर होणार असून, म्हसावदकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. म्हसावद येथील रेल्वे



मार्गावरील वाहतूक कोंडी आणि नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी या उड्डाणपुलाचे काम हाती घेण्यात आले होते. सन २०२० मध्ये या प्रकल्पासाठी २५ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. मात्र, काम सुरू झाल्यानंतर वाढत्या बांधकाम खर्चामुळे मंजूर निधी अपुरा पडला. दरम्यान, पुलाचे सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले; मात्र उर्वरित कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध न झाल्याने प्रकल्प रखडला. त्यामुळे नागरिकांना पुन्हा रेल्वे फाटकावरूनच ये-जा करावी लागत होती. पुलाचे काम लवकर पूर्ण व्हावे, अशी मागणी सातत्याने होत होती. पुलाच्या रखडलेल्या कामाची दखल घेत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी गेल्या सहा महिन्यांपासून शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुधारित अंदाजपत्रकाला मंजुरी मिळावी आणि आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी त्यांनी संबंधित विभागांकडे पाठपुरावा केला. या प्रयत्नांना आता यश आले असून, शासनाने ४५ कोटी ८२ लाख रुपयांच्या सुधारित खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पूर्वी मंजूर असलेल्या २५ कोटी रुपयांच्या तुलनेत २० कोटी ८२ लाख रुपयांच्या वाढीव खर्चाचा मार्ग मोकळा झाला आहे. निधीची अडचण दूर झाल्याने म्हसावद रेल्वे उड्डाणपुलाचे रखडलेले उर्वरित काम आता वेगाने पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर रेल्वे फाटकावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून, परिसरातील नागरिकांची दैनंदिन गैरसोयही दूर होणार आहे.

### नागरिकांमध्ये समाधान व्यक्त

"म्हसावद रेल्वे उड्डाणपूल लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेत आणण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले जातील," अशी माहिती पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. शासनाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेमुळे अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या या महत्त्वाच्या प्रकल्पाच्या कामाला आता प्रत्यक्ष गती मिळणार असल्याने म्हसावदसह परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...
डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!
तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत पोहोचवायच्या आहेत का?
मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत
अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ



संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला कोळगावच्या गोपीचंद पुना पाटील विद्यालयात 'सजीव राखी'चा अनोखा उपक्रम..!

## ४० विद्यार्थ्यांना मिळाली बहिणीची माया; २५ विद्यार्थिनींनी मानले विद्यार्थ्यांना भाऊ

जन सम्राट टाईम्स

**भडगांव |:** तालुक्यातील गोपीचंद पुना पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोळगांव येथे रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक राख्या तयार करून पारंपरिक रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा केला.यावेळी 'सजीव राखी'च्या माध्यमातून भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, आपुलकी, जिव्हाळा आणि परस्पर सहकार्याचा संदेश देण्यात आला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता,पर्यावरण संवर्धनाची जाणीव तसेच भारतीय संस्कृती व परंपरांविषयी आदर निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री.आर.आर. वळखंडे होते. विद्यार्थीनींनी त्यांनाही राखी बांधून सण साजरा केला,त्यानंतर रक्षाबंधनाचे महत्त्व विशद करताना सांगितले की,भाऊ-बहिणीचे नाते हे प्रेम,विश्वास,जिव्हाळा आणि परस्पर संरक्षणाचे प्रतीक आहे. विद्यालयातील ज्या सुमारे ४० विद्यार्थ्यांना सख्ख्या बहिणी नाहीत,अशा विद्यार्थ्यांना विद्यालयातील बहिणींनी राखी बांधून बहिणीच्या प्रेमाची उणीव भरून काढली.तसेच ज्या २५ विद्यार्थिनींना भाऊ नाही,त्यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना भाऊ मानून त्यांच्याकडून राखी बांधून घेतली.त्यामुळे या उपक्रमाला सामाजिक आणि भावनिक स्वरूप



प्राप्त झाले. यावेळी विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाची परंपरा,त्यामागील सांस्कृतिक व भावनिक महत्त्व तसेच रक्षाबंधनाची विधीवत पद्धत याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली.आई-वडिलांनंतर रक्ताच्या नात्यात भाऊ-बहिणीचे नाते अत्यंत जिव्हाळ्याचे असते. त्यामुळे प्रत्येक भावाने आपल्या बहिणीचा प्रेमाने आदर व सन्मान करावा, तिच्या सुख-दुःखात साथ द्यावी आणि संकटाच्या काळात तिच्या मदतीला धावून जावे,असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. रक्षाबंधनाच्या माध्यमातून केवळ राखी बांधण्याची परंपरा न जोपासता बंधुभाव, सामाजिक सलोखा, परस्पर सन्मान आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री.एस.ए.वाघ यांनी केले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विद्यालयातील महिला शिक्षिका श्रीमती सरिता पाटील,श्रीमती चारुलता पाटील व श्रीमती तृप्ती भामरे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, 'सजीव राखी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी माणुसकीच्या नात्याची वीण अधिक घट्ट केली, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.तालुक्यातील गोपीचंद पुना पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोळगांव येथे रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक राख्या तयार करून पारंपरिक रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा केला.यावेळी 'सजीव राखी'च्या माध्यमातून भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, आपुलकी, जिव्हाळा आणि परस्पर सहकार्याचा संदेश देण्यात आला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता,पर्यावरण संवर्धनाची जाणीव तसेच भारतीय संस्कृती व परंपरांविषयी आदर निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# पळासखेडे-रूपनगर सोसायटीत ठरावावरून वाद!

जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी :** पळासखेडे/रूपनगर येथील विविध कार्यकारी सहकारी संस्थेत (वि.का.सोसा.) बँक प्रतिनिधी नियुक्तीच्या ठरावावरून वाद निर्माण झाला आहे. सभा रद्द झाल्याची घोषणा केल्यानंतर काही संचालकांनी संस्थेच्या कार्यालयात बंद दाराआड ठराव मंजूर करून तो सहायक निबंधक कार्यालयात सादर केल्याचा आरोप संस्थेतील काही संचालक व सदस्यांनी केला आहे. या प्रकरणी संस्थेच्या सचिवाविरुद्ध चौकशी करून निलंबनाची कारवाई करावी तसेच फसवणूकप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. वादावादीमुळे सभा रद्द केल्याची घोषणा मिळालेल्या माहितीनुसार, पळासखेडे/रूपनगर येथील वि.का. संस्थेअंतर्गत बँक प्रतिनिधी नियुक्तीबाबत नवीन ठराव मंजूर करण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी संस्थेची थकबाकीची स्थिती असल्याने कार्यरत संचालक मंडळाला केवळ संचालकांच्या मताने ठराव करता येतो का, यावर प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यामुळे सदर ठराव सदस्यांच्या माध्यमातून मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. दरम्यान, बैठकीत वादावादी व गोंधळ निर्माण झाल्याने सचिव आणि चेअरमन यांनी सभा रद्द केल्याची घोषणा केली, असा आरोप करण्यात आला आहे. तसेच दोन दिवसांनंतर पुन्हा सभा घेऊन बँक प्रतिनिधी नियुक्तीचा ठराव मंजूर करण्यात येईल, असे संचालक व सदस्यांना सांगण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. सभा रद्द झाल्यानंतर बंद दाराआड ठराव केल्याचा आरोप सभा रद्द झाल्याने सर्व संचालक व सदस्य घरी गेल्यानंतर काही संचालकांनी संस्थेच्या कार्यालयात पुन्हा प्रवेश करून कार्यालयाचे दार बंद करून ठराव मंजूर केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. हा ठराव नियमबाह्य पद्धतीने मंजूर करण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# कृती समिती'च्या सहाही लढवय्या मित्रांची शिक्षक म्हणून निवड!

## हक्काच्या लढ्याला यशाचे फळ




जन सम्राट टाईम्स

**नागपूर | प्रतिनिधी :** शिक्षक भरती २०२५ - २६ मध्ये जागावाढ व्हावी यासाठी स्थापन झालेल्या 'कृती समिती'च्या आंदोलनाला आणि अहोरात्र घेतलेल्या परिश्रमाला अखेर मोठे यश आले आहे. आपल्या हक्काच्या मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या, तसेच निवेदने देऊन उपोषणाचा इशारा देणाऱ्या या समितीमधील सहा प्रमुख मित्रांची पवित्र पोर्टलच्या अंतिम निकालात शिक्षक म्हणून निवड झाली आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत जागा वाढवून बेरोजगारांना न्याय मिळावा, यासाठी या तरुणांनी संघटित होऊन 'कृती समिती'ची स्थापना केली होती. या समितीच्या माध्यमातून या सहाही मित्रांनी दिवस-रात्र एक करून संपूर्ण राज्यभरात आणि स्थानिक पातळीवर आंदोलनाचे हत्यार उपसले होते. प्रशासनाला झुकवण्यासाठी त्यांनी दिलेल्या कायदेशीर लढ्याचे आणि परिश्रमाचे कौतुक आता सर्व स्तरांतून होत आहे. या लढवय्या मित्रांची खालील ठिकाणी झाली निवड:

सुरेश भुरे – जिल्हा परिषद, नागपूर
शंकर नागपुरे – जिल्हा परिषद, नागपूर
चंद्रकांत महाजन – जिल्हा परिषद, भंडारा
ओमप्रकाश टाकळकर – जिल्हा परिषद, भंडारा
रामकृष्ण मरगळे – स्वामी शिक्षण संस्था, कोल्हापूर
शिवाजी कदम - जिल्हा परिषद यवतमाळ

संघर्षातून यशाचा मार्ग... "मागण्या पूर्ण न झाल्यास थेट उपोषणाला बसू", असा आक्रमक पण सनदशीर इशारा देणाऱ्या या मित्रांनी पवित्र पोर्टलच्या निकालानंतर थेट नियुक्तीचे पत्र मिळविणार आहेत. एकत्र येऊन प्रामाणिकपणे लढा दिला तर यश नक्की मिळते, हेच या सहाही मित्रांनी आपल्या उदाहरणातून सिद्ध केले आहे. त्यांच्या या यशामुळे शिक्षक भरतीसाठी संघर्ष करणाऱ्या इतर उमेदवारांमध्येही एक आशेचा किरण निर्माण झाला आहे. सर्व स्तरांतून या सहाही नवनियुक्त होणाऱ्या शिक्षकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिजामाता कन्या विद्यालयाच्या वसतिगृहात रक्षाबंधनाचा अनोखा स्नेहबंध

## विद्यार्थिनींनी बांधली वसतिगृहातील विद्यार्थ्यांना राखी

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या पवित्र आणि अतूट नात्याचा सण. याच भावनेला सामाजिक बांधिलकीची जोड देत श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या जिजामाता कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात रक्षाबंधनाचा अनोखा स्नेहबंध जपणारा उपक्रम उत्साहात पार पडला. संस्थेच्या जिजामाता कन्या विद्यालयाच्या वसतिगृहातील अनेक विद्यार्थिनी रक्षाबंधनानिमित्त गावी जाऊ शकल्या नाहीत. त्याचप्रमाणे संस्थेच्याच छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वसतिगृहातील अनेक विद्यार्थीही सणासाठी आपल्या गावी जाऊ शकले नाहीत. त्यामुळे सणाच्या दिवशी विद्यार्थ्यांना कुटुंबीयांची व बहिणीची उणीव भासू नये, या उद्देशाने दोन्ही वसतिगृहांतील विद्यार्थ्यांसाठी हा आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यालयाच्या प्राचार्य सौ. अपर्णा विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वसतिगृह अधीक्षिका सौ. हेमांगी शिंदे यांच्या समन्वयातून



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राखीच्या धाग्यातून जुळले नवे नाते यावेळी जिजामाता कन्या विद्यालयाच्या वसतिगृहातील विद्यार्थिनींनी छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. राखी बांधताना विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद आणि विद्यार्थ्यांच्या मनात बहिणीच्या प्रेमाची भावना दिसून आली. या उपक्रमामुळे दोन्ही वसतिगृहांमध्ये उत्साहाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले. राखी बांधल्यानंतर भारावून गेलेल्या विद्यार्थ्यांनीही आपल्या बहिणींना शैक्षणिक साहित्य भेट देत स्नेह व्यक्त केला. बहिणीच्या रक्षणासोबतच तिच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सदैव पाठीशी उभे राहण्याची भावना त्यांनी व्यक्त केली. 'राखी' नव्हे, तर प्रेम-विश्वासाचा स्नेहबंध रक्षाबंधन हा केवळ मनगटावर राखी बांधण्याचा सण नसून प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि संरक्षणाच्या भावनेचे प्रतीक आहे. गावापासून दूर राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कौटुंबिक जिव्हाळा निर्माण व्हावा आणि सणाच्या आनंदापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये, या उद्देशाने संस्थेने राबविलेला हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरला. या उपक्रमातून वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण झाली असून, रक्ताच्या नात्यांपलीकडेही माणुसकीच्या आणि स्नेहाच्या नात्यांची वीण घट्ट करता येते, हे अधोरेखित झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. पी. टी. लाडे तथा वसतिगृह अधीक्षक यांनी मोलाचे सहकार्य केले.

# कौशल्य विकास प्रशिक्षणातून रोजगाराची संधी; युवक-युवतींनी लाभ घेण्याचे आवाहन

## शिक्षक-शिक्षिका व कर्मचाऱ्यांमध्ये दृढ झाले स्नेहबंध

जन सम्राट टाईम्स

**परभणी। प्रतिनिधी :** राज्यातील युवक-युवतींना कौशल्य विकासाच्या माध्यमातून सक्षम करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत 'प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सुशिक्षित बेरोजगारांसाठी विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचे कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाणार आहे. परभणी जिल्ह्यातही स्थानिक गरजा लक्षात घेऊन किमान कौशल्य विकास कार्यक्रमाच्या जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत विविध प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामुळे युवक-युवतींना कौशल्य आत्मसात करून रोजगार तसेच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या प्रशिक्षणामध्ये डेअरी प्रोसेसर, शेळीपालन, रेशीम उद्योग, शिलाई मशीन प्रशिक्षण, चर्मकार प्रशिक्षण,



जिनिंग मशीन फिटर, हापसा/हातपंप दुरुस्ती (प्लंबर), शेळी व मेंढीपालन, नीडल क्राफ्ट ऑफ बंजारा/बंजारी आणि सोलार क्षेत्रातील प्रशिक्षण आदी रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा समावेश आहे. महिलांना विशेष प्राधान्य प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी लाभार्थ्यांची निवड करताना किमान ५० टक्के लाभार्थी महिला असणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच एकल महिलांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यामुळे महिलांसह ग्रामीण भागातील युवक-युवतींनाही रोजगारक्षम कौशल्य विकसित करण्याची संधी मिळणार आहे. प्रशिक्षण केंद्रांना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन दरम्यान, स्किल इंडिया पोर्टलवर नोंदणीकृत तसेच संलग्नता व मान्यता प्राप्त प्रशिक्षण केंद्रे आणि प्रशिक्षण प्रदात्यांनी परभणी जिल्ह्यात कौशल्य विकास प्रशिक्षण राबविण्यासाठीचे प्रस्ताव ४ सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व मार्गदर्शन केंद्र, परभणी येथे सादर करावेत. जिल्ह्यातील युवक-युवतींना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित प्रशिक्षण केंद्रे व प्रशिक्षण प्रदात्यांनी विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व मार्गदर्शन केंद्र, परभणी यांनी केले.

# यावल तालुक्यात सरपंचाकडून हवेत गोळीबार

जन सम्राट टाईम्स

**यावल । प्रतिनिधी:** यावल तालुक्यातील कोळन्हावी येथील लोकनियुक्त सरपंचाने डांभुर्णी गावातील मुख्य चौकात गावठी पिस्तूलमधून हवेत गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, याप्रकरणी यावल पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विकास जगन्नाथ सोळुंके (रा. कोळन्हावी, ता. यावल)



असे हवेत गोळीबार केल्याचा आरोप असलेल्या सरपंचाचे नाव आहे. त्यांनी डांभुर्णी येथील मुख्य चौकात गावठी पिस्तूलमधून हवेत फायरिंग केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. पोलिसांच्या चौकशीत सोळुंके यांनी सदर गावठी पिस्तूल भुसावळ येथील रोशन भीमराव सपकाळे याच्याकडून सुमारे तीन महिन्यांपूर्वी खरेदी केल्याचे सांगितल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे बेकायदेशीर शस्त्र खरेदी-विक्रीच्या या प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची शक्यता असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणी यावल पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल हितेश बागुल यांच्या तक्रारीवरून दोन जणांविरुद्ध बेकायदेशीर शस्त्र बाळगणे तसेच गोळीबार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, सदर गावठी पिस्तूल नेमके कोठून आणण्यात आले, त्याची विक्री करणाऱ्या व्यक्तीचा यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच गोळीबार करण्यामागील नेमके कारण काय, याचा तपास पोलीस करत आहेत.

# बापुसाहेब घोडेस्वार यांच्या निर्भीड लेखणीचा राज्यभर डंका

जन सम्राट टाईम्स

**अहिल्यानगर / जामखेड | प्रतिनिधी:** आपल्या धारदार आणि निर्भीड लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणारे जामखेड तालुक्यातील साकत गावचे भूमिपुत्र तथा ज्येष्ठ पत्रकार बापुसाहेब रावसाहेब घोडेस्वार यांना यंदाचा प्रतिष्ठेचा 'राज्यस्तरीय महाराष्ट्र गुणगौरव आदर्श पत्रकार पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल साकत गावासह जामखेड तालुका आणि अहिल्यानगर जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पत्रकारितेच्या क्षेत्रातील प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानाची दखल घेत राज्य निवड समितीने बापुसाहेब घोडेस्वार यांची या पुरस्कारासाठी निवड केली आहे. पुरस्काराचे वितरण ६ सप्टेंबर २०२६ रोजी शिर्डी येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सोहळ्यात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी आणि पत्रकार उपस्थित राहणार आहेत. एकाच वर्षात दुहेरी राज्यस्तरीय बहुमान २०२६ हे वर्ष बापुसाहेब घोडेस्वार यांच्या पत्रकारितेच्या कारकिर्दीसाठी विशेष ठरले आहे. काही महिन्यांपूर्वीच त्यांना 'राजमाता अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले होते. त्यानंतर आता 'महाराष्ट्र गुणगौरव आदर्श पत्रकार पुरस्कार'



जाहीर झाल्याने एकाच वर्षात दोन राज्यस्तरीय पुरस्कार मिळविण्याचा बहुमान त्यांना मिळाला आहे. ग्रामीण भागातून पत्रकारितेला सुरुवात करून आपल्या लेखणीच्या माध्यमातून राज्यस्तरावर स्वतंत्र ओळख निर्माण करणारे घोडेस्वार यांचे हे यश जामखेड तालुक्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. दबावाला न जुमानता निर्भीड पत्रकारिता सत्य आणि जनतेच्या प्रश्नांच्या बाजूने ठामपणे उभे राहणारे पत्रकार म्हणून बापुसाहेब घोडेस्वार यांची परिसरात ओळख आहे. ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न, शेतकऱ्यांच्या अडचणी, वंचित घटकांच्या समस्या तसेच प्रशासनाशी संबंधित प्रश्न त्यांनी सातत्याने आपल्या वृत्तांकनातून मांडले आहेत. कोणत्याही राजकीय अथवा सामाजिक दबावाला बळी न पडता निष्पक्ष आणि लोकहिताची पत्रकारिता करण्यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या याच तत्त्वनिष्ठ पत्रकारितेची दखल घेत राज्यस्तरीय पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आल्याने हा सन्मान त्यांच्या प्रामाणिक आणि निर्भीड पत्रकारितेचा गौरव असल्याची भावना व्यक्त होत आहे. साकतसह जामखेडमध्ये आनंदाचे वातावरण पुरस्काराची घोषणा होताच साकत गावासह जामखेड तालुक्यातील पत्रकार वर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पत्रकारांच्या प्रश्नांसाठी सरकारविरोधातील लढा अधिक तीव्र करणार

## 'व्हॉइस ऑफ मीडिया'ची जिल्हा बैठक; संघटनात्मक बांधणीसह कृतिशील कार्यक्रमांची आखणी

जन सम्राट टाईम्स

**संभाजीनगर | प्रतिनिधी :** राज्यातील पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी 'व्हॉइस ऑफ मीडिया'च्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष आता अधिक तीव्र करण्यात येणार आहे. पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटितपणे लढा उभारण्याची गरज असून, प्रश्न केवळ निवेदनांपुरते मर्यादित न ठेवता त्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि कृतिशील कार्यक्रम राबविण्यात येतील. या लढ्यासाठी राज्यातील प्रत्येक पत्रकाराची साथ आवश्यक आहे, असे प्रतिपादन व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया यांनी केले. संभाजीनगर येथे आयोजित 'व्हॉइस ऑफ मीडिया'च्या जिल्हा बैठकीत पदाधिकारी व सदस्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष कानिप अन्नपूर्णे आणि कार्याध्यक्ष किशोर महाजन यांनी विजय चोरडिया यांचे स्वागत केले. पत्रकारांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज पत्रकार हा लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून, समाजातील सामान्य नागरिकांचे प्रश्न शासन आणि प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम तो करतो. मात्र हे काम करणाऱ्या पत्रकारांच्या स्वतःच्या समस्या अनेकदा दुर्लक्षित राहतात. पत्रकारांना सुरक्षित वातावरण, सामाजिक सुरक्षा, मुलांच्या शिक्षणासाठी मदत, कौशल्यविकासाच्या संधी तसेच सेवानिवृत्तीनंतर आर्थिक आधार मिळणे आवश्यक आहे. या प्रश्नांसाठी संघटनेने व्यापक आणि सातत्यपूर्ण लढा उभारला पाहिजे, असे चोरडिया यांनी स्पष्ट केले. केवळ सरकारकडे मागण्या मांडणे पुरेसे नसून, त्या मागण्यांचा सातत्याने पाठपुरावा करून त्या पूर्ण होईपर्यंत संघर्ष करण्याची भूमिका 'व्हॉइस ऑफ मीडिया'ने घेतली आहे. राज्यातील पत्रकारांना एकत्र आणून त्यांच्या प्रश्नांना संघटित ताकद देणे, प्रत्येक जिल्ह्यात संघटनात्मक बांधणी मजबूत करणे आणि त्यानंतर स्थानिक पातळीवर पत्रकारांच्या प्रश्नांवर कृतिशील कार्यक्रम उभारणे, ही पुढील काळातील दिशा असेल, असेही त्यांनी सांगितले. आठ दिवसांत कार्यकारिणी जाहीर होणार दरम्यान, संभाजीनगर जिल्ह्यात संघटनात्मक बांधणीला वेग देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. जिल्हा, शहर आणि तालुका पातळीवरील कार्यकारिणी येत्या आठ दिवसांत जाहीर करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाध्यक्ष कानिप अन्नपूर्णे यांनी दिली. संघटनेची रचना पूर्ण झाल्यानंतर संभाजीनगर जिल्ह्यात पत्रकारांच्या प्रश्नांवर आधारित ठोस आणि कृतिशील कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. केवळ पदाधिकाऱ्यांची नियुक्ती न करता प्रत्येक पदाधिकाऱ्याने संघटनेच्या कामात सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार असल्याचे अन्नपूर्णे यांनी सांगितले. पत्रकारांच्या कल्याणासाठी पंचसूत्री कार्याध्यक्ष किशोर महाजन यांनी संभाजीनगरमध्ये लवकरच अभूतपूर्व उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर पत्रकारांच्या स्थानिक समस्यांचा अभ्यास करून त्यावर पुढाकार घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांचे घर, आरोग्य, मुलांचे शिक्षण, स्किलिंग आणि सेवानिवृत्तीनंतरचे जीवन या पंचसूत्रीवर 'व्हॉइस ऑफ मीडिया' काम करत आहे. पत्रकारांच्या आयुष्याशी संबंधित या पाच महत्त्वाच्या प्रश्नांना संघटनेने आपल्या कार्याचा केंद्रबिंदू बनवले आहे. संभाजीनगरमधील पत्रकारांसाठीही या माध्यमातून ठोस उपक्रम राबविण्यात येतील, अशी ग्वाही महाजन यांनी दिली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# विद्यार्थ्यांच्या हातातील राख्या जवानांच्या मनगटावर; योगमाया प्रतिष्ठानचा देशप्रेमाचा अनोखा उपक्रम

## ‘एक राखी देश के नाम’ला प्रतिसाद; मिलिटरी स्टेशनमध्ये ‘भारत माता की जय’च्या घोषणांनी दुमदुमले सभागृह

जन सम्राट टाईम्स



**मुक्ताईनगर । प्रतिनिधी:** रक्षाबंधनाच्या निमित्ताने देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी योगमाया प्रतिष्ठान, मुक्ताईनगर यांच्या वतीने ‘एक राखी देश के नाम’ हा भावनिक आणि देशप्रेम जागविणारा उपक्रम राबविण्यात आला. १४ ते २४ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला मुक्ताईनगर शहरासह ग्रामीण भागातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने आकर्षक राख्या तयार केल्या. त्यासोबतच जवानांसाठी शुभेच्छा पत्रके आणि कृतज्ञता व्यक्त करणारी हस्तलिखित पत्रेही तयार करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या भावना या माध्यमातून जवानांपर्यंत पोहोचवत देशसेवेबद्दल आदर व्यक्त केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच त्यांच्यात देशप्रेमाची भावना रुजविण्याचा प्रयत्न झाला. विविध शाळांचा उत्स्फूर्त सहभाग या उपक्रमात सौ. तु. ल. कोळंबे प्राथमिक विद्यामंदिर, जे.ई. स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, स्व. निखिल भाऊ खडसे इंग्लिश मिडीयम स्कूल, श्री. एकनाथराव खडसे टॅलेंट स्कूल, आदर्श इंग्लिश मीडियम स्कूल, डॉ. जगदीश पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, संत मुक्ताबाई माध्यमिक विद्यालय, संत मुक्ताबाई कनिष्ठ महाविद्यालय यांच्यासह ग्रामीण भागातील मंजाबाई महादू नारखेडे माध्यमिक विद्यालय (रुईखेडा), नवीन माध्यमिक विद्यालय (निमखेडी) आणि पूर्णामाई माध्यमिक विद्यालय (घोडसगाव) येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. भुसावळ मिलिटरी स्टेशनवर राख्यांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या, शुभेच्छा पत्रके आणि हस्तलिखित पत्रांचे भुसावळ मिलिटरी स्टेशन (आरपीडी एरिया) येथे भव्य प्रदर्शन भरविण्यात आले. भारतीय सैन्य दलाच्या प्रशिक्षण केंद्रात सुरू असलेल्या एनसीसी कॅम्पच्या ठिकाणी आयोजित या कार्यक्रमात जवानांना प्रत्यक्ष राखी बांधून रक्षाबंधनाचा उत्सव साजरा करण्यात आला. आपल्या कुटुंबीयांपासून आणि बहिणींपासून दूर राहून देशसेवा करणाऱ्या जवानांना विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्या व पत्रे पाहून विशेष आनंद झाला. जवानांच्या मनगटावर विद्यार्थिनींनी बांधलेल्या राख्यांमुळे भावनिक वातावरण निर्माण झाले. सैन्य अधिकाऱ्यांकडून उपक्रमाचे कौतुक यावेळी १८ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर धीरज मिनोत्रा, एस.ओ. श्यामबाबू यांच्यासह सैन्य दलातील वरिष्ठ अधिकारी आणि जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते. योगमाया प्रतिष्ठानच्या या अनोख्या देशप्रेमाच्या उपक्रमाचे उपस्थित अधिकारी व जवानांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी संपूर्ण सभागृह ‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम’, ‘जय हिंद’ आणि ‘हाऊस द जोश’ अशा घोषणांनी दुमदुमून गेले. या घोषणांमुळे कार्यक्रमस्थळी देशप्रेमाचे उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी योगमाया प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्यांच्या माध्यमातून जवानांप्रती कृतज्ञता आणि देशसेवेचा सन्मान व्यक्त करणारा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला.

# भुजरीया पर्वानिमित्त कांचन नगरात कुशवाह राजपूत समाजाची रॅली

जन सम्राट टाईम्स



**जळगाव| प्रतिनिधी** कुशवाह राजपूत समाजाच्या वतीने भुजरीया पर्वानिमित्त पारंपरिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कांचन नगर परिसरात झालेल्या या सोहळ्याला समाजातील माता-भगिनी, युवक-युवती तसेच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पारंपरिक उत्साह, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक एकतेचा संदेश देत हा उत्सव आनंदात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी पारंपरिक पद्धतीने भुजऱ्यांचे पूजन करण्यात आले. यानंतर कांचन नगर परिसरातून भव्य रॅली काढण्यात आली. DJच्या तालावर समाजबांधवांनी जल्लोष केला. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला व युवक-युवती तसेच हातात भुजऱ्या घेऊन सहभागी झालेल्या समाजबांधवांमुळे रॅलीला विशेष शोभा आली. भुजरीया पर्वाच्या माध्यमातून कुशवाह राजपूत समाजाची पारंपरिक संस्कृती, रूढी-परंपरा आणि सामाजिक मूल्ये जपण्याचा संदेश देण्यात आला. या उत्सवाच्या निमित्ताने समाजातील एकोपा, बंधुभाव आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. कुशवाह राजपूत बहुउद्देशीय संस्था, जळगावचे अध्यक्ष जगदीश सुभाष राजपूत, उपाध्यक्ष दीपक राजपूत तसेच संस्था कार्यकारिणी आणि समस्त कुशवाह राजपूत समाजबांधवांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत उत्सवाचा आनंद द्विगुणित केला. भुजरीया पर्वाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमातून ‘एकता, संस्कृती, परंपरा आणि समाजसेवा’ या मूल्यांचा जागर करण्यात आला. पारंपरिक संस्कृतीचे जतन करत नव्या पिढीपर्यंत ती पोहोचविण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# ॲड. बाळासाहेब आंबेडकरांना मुंबई मनपा आयुक्तांची भेट!

## वंचित बहुजन आघाडीचे निवेदन



जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मुंबई म्युनिसिपल कामगार संघाचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब प्रकाश आंबेडकर यांना मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडून वारंवार भेट नाकारण्यात आल्याचा आरोप करत पारोळा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी पारोळा पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांवर मुंबई महानगरपालिका प्रशासनाशी चर्चा करण्यासाठी ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी वेळोवेळी भेटीची मागणी केली होती. मात्र, त्यांना वारंवार भेट नाकारण्यात आल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीने निवेदनातून केला आहे.


लोकशाही व्यवस्थेत जनतेच्या प्रश्नांसाठी कार्यरत असलेल्या सामाजिक नेते, कामगार संघटनांचे प्रतिनिधी आणि लोकप्रतिनिधींना प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देऊन त्यांच्या समस्या व मागण्या ऐकून घेणे अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत वारंवार भेट नाकारली जाणे हे लोकशाही मूल्ये आणि प्रशासकीय पारदर्शकतेला बाधक असल्याची भूमिका वंचित बहुजन आघाडीने मांडली.

भेट नाकारण्यामागील कारणे जाहीर करण्याची मागणी ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांना भेट नाकारण्यामागील नेमकी कारणे काय आहेत, याची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. भेट नाकारण्याची कारणे सार्वजनिक करावीत आणि भविष्यात कामगार व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी प्रशासनाकडे येणाऱ्या प्रतिनिधींना योग्य वेळ देऊन त्यांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी आवश्यक प्रशासकीय निर्देश द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली. वंचित बहुजन आघाडीच्या प्रमुख मागण्या ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांना वारंवार भेट नाकारल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी. भेट कोणत्या कारणामुळे नाकारण्यात आली, याची कारणे सार्वजनिक करावीत. दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करावी. कामगार व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी येणाऱ्या प्रतिनिधींना भेटीसाठी योग्य प्रशासकीय व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. या मागण्यांचे निवेदन वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष दयाराम मोरे, शहराध्यक्ष कमलेश सोनवणे, युवाध्यक्ष विजय बागुल, प्रसिद्धीप्रमुख राहुल सरदार, महासचिव श्रीकांत सोनवणे, उच्च समितीचे अध्यक्ष रोहित बागुल, विकास रामोशी, योगेश महाले, जिल्हा सदस्य, कार्याध्यक्ष उज्वल मंगळे, सचिव राजू कांबळे, उपाध्यक्ष जवाहरलाल केदार, कांतीलाल करंजे आदींच्या वतीने देण्यात आले.

# सावदा पोलिसांची मोठी कारवाई; ट्रकच्या चोरीच्या बॅटऱ्यांसह एकाला अटक

## पोलिसांची धडक कारवाई; ७१ हजारांचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स



**सावदा। प्रतिनिधी:** सावदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्रगस्ती दरम्यान संशयास्पदरीत्या ट्रकच्या बॅटऱ्या घेऊन जाणाऱ्या एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीच्या तीन ट्रक बॅटऱ्या आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी सावदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, एक संशयित अंधाराचा फायदा घेत फरार झाला आहे. रात्रगस्तीतील पोलिसांना संशय २७ ऑगस्ट रोजी रात्री ११ ते २८ ऑगस्ट रोजी सकाळी ५ वाजेपर्यंत सावदा पोलिसांचे कर्मचारी व होमगार्ड हतनूर धरणाकडून हतनूर गावाकडे जाणाऱ्या मार्गावर रात्रगस्त घालत होते. दरम्यान, रात्री सुमारे १.३० वाजता उदळी गावाच्या बसस्थानकाजवळ पोलिसांना सीबीझेड एक्स्ट्रीम मोटारसायकलवर दोन इसम गोणपाट घेऊन संशयास्पदरीत्या जाताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला असता दोघांनीही पोलिसांना हुलकावणी देत पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग केला. सुमारे १.४५ वाजता त्यांना गाठण्यात आले. मात्र मोटारसायकल चालविणारा इसम अंधाराचा फायदा घेत गल्लीबोळातून फरार झाला. मागे बसलेल्या इसमाला पोलिसांनी ताब्यात घेतले. तीन ट्रक बॅटऱ्या जप्त ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव विशाल शांताराम कोळी (वय २८, रा. कडगाव, ता. यावल, जि. जळगाव) असे आहे. तर फरार झालेल्या संशयिताचे नाव मोहन प्रकाश कोळी (रा. कडगाव, ता. यावल) असे आहे. विशाल कोळी याच्याकडे गोणपाटातील बॅटऱ्यांबाबत विचारणा केली असता त्याने समाधानकारक माहिती दिली नाही. प्राथमिक तपासात या बॅटऱ्या जळगाव शहरातील रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकमधून काढून चोरून आणल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. प्रकारे एकूण ₹७१,००० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. मुंबई पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा याप्रकरणी पोलीस कर्मचारी सुनील जानकिराम कुरकुरे यांनी फिर्याद दिली आहे. सावदा पोलीस ठाण्यात FIR क्र. ०२२२/२०२६ अन्वये मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम १२४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार संशयिताचा शोध घेण्यासह पुढील तपास सावदा पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित व उपविभागीय पोलीस अधिकारी नंदराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश फड, पोहेका अक्षय हिरोळे, पोलीस कॉन्स्टेबल सुनील कुरकुरे, संजय तडवी, होमगार्ड प्रशांत पाटील व संतोष सपकाळे यांनी केली.

# सावदा पोलिसांची मोठी कारवाई; साडेदहा लाखांचा गुटखा जप्त

## प्रतिबंधित विमल पानमसाला व सुगंधित तंबाखूची कारमधून वाहतूक

जन सम्राट टाईम्स



**सावदा । (प्रतिनिधी):** महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटखा, विमल पानमसाला आणि सुगंधित तंबाखूची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या एकाला सावदा पोलिसांनी रंगेहात पकडले. तांदलवाडी फाट्याजवळ केलेल्या या कारवाईत पोलिसांनी प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांसह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली होंडा अमेझ कार असा एकूण १० लाख २७ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सावदा पोलिसांना २७ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे १०.५० वाजता गुप्त माहिती मिळाली की, राखाडी रंगाच्या होंडा अमेझ (एमएच-१९-सीव्ही-४४४५) कारमधून प्रतिबंधित गुटख्याची चोरटी वाहतूक तांदलवाडी फाट्याच्या मार्गाने होणार आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी तांदलवाडी फाट्याजवळ सापळा रचला. रात्री ११.०४ वाजता संशयित कार तेथे येताच पोलिसांनी ती अडवून तपासणी केली. कारचालक सारंग मुरलीधर अवचार (वय ३१, रा. अकलूद, ता. यावल, जि. जळगाव) याच्याकडे चौकशी केली असता कारमध्ये प्रतिबंधित गुटखा असल्याचे समोर आले. दोन पंचांच्या उपस्थितीत कारची झडती घेतली असता मोठ्या प्रमाणात विमल पानमसाला, केशरयुक्त पानमसाला आणि तंबाखूची पाकिटे आढळून आली. १० लाख २७ हजारांचा मुद्देमाल जप्त पोलिसांनी कारवाईत ५ लाख २७ हजार ७०० रुपये किमतीचा विमल पानमसाला, पानमसाला व तंबाखूचा साठा जप्त केला. तसेच गुटख्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली ५ लाख रुपये किमतीची होंडा अमेझ कार ताब्यात घेण्यात आली. अशा प्रकारे एकूण १० लाख २७ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. भुसावळ-वरणगाव परिसरात विक्रीचा संशय पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने हा प्रतिबंधित माल मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर येथील एका व्यापाऱ्याकडून आणला असून तो भुसावळ व वरणगाव परिसरात किरकोळ विक्रीसाठी नेत असल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी सावदा पोलीस ठाण्यात FIR क्रमांक ०२२२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ मधील कलम १२३, २७४, २७५, १०६, २२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मधील कलम २६(२)(i), २६(२)(iv), ३०(२)(a) व ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित व उपविभागीय पोलीस अधिकारी नंदराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश फड, पोलीस उपनिरीक्षक राहुल सानप, पोहेका/४६८ निलेश बाविस्कर यांच्यासह पोलिसांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राहुल सानप करीत आहेत.

# खानकाह-ए-चिश्तिया निजामियामध्ये मोए मुबारकचे दर्शन!

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर। प्रतिनिधी:** ईद-ए-मिलाद-उन-नबी अर्थात १२ रबी-उल-अव्वल या पवित्र पर्वानिमित्त मलकापूर येथील खानकाह-ए-चिश्तिया निजामिया येथे पैगंबर हजरत मोहम्मद मुस्तफा यांच्या पवित्र मोए मुबारकचे दर्शन आयोजित करण्यात आले.

श्रद्धा, भक्ती आणि आदराच्या वातावरणात झालेल्या या रूहानी कार्यक्रमाला भाविकांची मोठी गर्दी झाली होती. बुधवार, २६ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. खानकाह-ए-चिश्तिया निजामिया, मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगरचे सज्जादानशीन हाजी मोहसिन अली फखरी निजामी यांच्या माध्यमातून विशेषतः आणण्यात आलेल्या मोए पाकच्या दर्शनासाठी मलकापूर शहरासह परिसरातील मोठ्या संख्येने अकीदतमंद उपस्थित होते. अदब-एहतरामाने घेतले मोए पाकचे दर्शन मोए मुबारकच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी शिस्तबद्ध



पद्धतीने आणि पूर्ण अदब-एहतराम राखत दर्शन घेतले. यावेळी संपूर्ण खानकाह परिसर दरूद-ओ-सलाम आणि नात-ए-पाकच्या स्वरांनी भक्तिमय झाला होता. श्रद्धेने भारावलेल्या वातावरणात भाविकांनी मोए मुबारकचे दर्शन घेतले. महिलांसाठी स्वतंत्र दर्शनाची व्यवस्था कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे महिलांसाठी स्वतंत्र पडदा व दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे मोठ्या संख्येने महिलांनीही श्रद्धा आणि आदरपूर्वक मोए पाकचे दर्शन घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खानकाह-ए-निजामिया कमिटीचे पदाधिकारी, सदस्य तसेच खादिमांनी विशेष परिश्रम घेतले. दर्शनाच्या वेळी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी नियोजन करण्यात आले होते. देशाच्या सुख-शांतीसाठी विशेष दुआ कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी देशात शांतता, सलोखा, सुरक्षितता, सुख-समृद्धी आणि प्रगती नांदावी, यासाठी विशेष दुआ करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांना मिठाईचा तब्बुरक वाटप करण्यात आला. ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमामुळे खानकाह परिसरात दिवसभर श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक वातावरण अनुभवायला मिळाले. ईद-ए-मिलाद-उन-नबी अर्थात १२ रबी-उल-अव्वल या पवित्र पर्वानिमित्त मलकापूर येथील खानकाह-ए-चिश्तिया निजामिया येथे पैगंबर हजरत मोहम्मद मुस्तफा यांच्या पवित्र मोए मुबारकचे दर्शन आयोजित करण्यात आले.

# राखीच्या धाग्यात जपला बहिणींच्या मायेचा अनमोल ठेवा – पालकमंत्री

## चोपड्यात बहिणी निर्जलाताई देशमुख व सुशीलाताई गुजर यांच्यासोबत रक्षाबंधन

जन सम्राट टाईम्स

**चोपडा/जळगाव । प्रतिनिधी:** पदे बदलतात, जबाबदाऱ्या वाढतात आणि काळ पुढे सरकतो; मात्र भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, माया आणि जिव्हाळा कायम तसाच राहतो. याच भावनेचा प्रत्यय रक्षाबंधनाच्या पवित्र दिवशी चोपडा येथे आला. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आपल्या बहिणी सौ. निर्जलाताई देशमुख आणि सौ. सुशीलाताई गुजर यांच्या घरी जाऊन कौटुंबिक आणि आपुलकीच्या वातावरणात रक्षाबंधन साजरे केले. बहिणींनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे औक्षण करून त्यांच्या मनगटावर राखी बांधली. यावेळी बहिणींनी त्यांच्या उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य आणि यशासाठी शुभेच्छा दिल्या. पालकमंत्री पाटील यांनीही बहिणींना भेटवस्तू देत आपला स्नेह व्यक्त केला. कुटुंबीयांच्या उपस्थितीत जुन्या आठवणींना उजाळा मिळाल्याने वातावरण भावनिक आणि आनंदमय झाले होते. “राखीचा धागा छोटा, पण त्यात आठवणींचे जग” यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, “राजकारणात पद कितीही मोठे मिळाले आणि जबाबदाऱ्या कितीही वाढल्या, तरी बहिणीसाठी भाऊ हा कायम भाऊच असतो. मनगटावर बांधलेला राखीचा धागा छोटा



असला, तरी त्यात बालपणाच्या असंख्य आठवणी, आई-वडिलांचे संस्कार आणि बहिणीची आयुष्यभराची माया गुंफलेली असते. बहिणींचे प्रेम आणि आशीर्वाद हीच माझ्या आयुष्यातील खरी श्रीमंती आहे.” रक्षाबंधन आणि भाऊबीजेच्या निमित्ताने बहिणींसोबत सण साजरा करण्याची परंपरा पालकमंत्री पाटील यांनी वर्षानुवर्षे जपली आहे. सार्वजनिक जीवनातील धावपळ आणि मंत्रीपदाच्या व्यस्ततेतही कुटुंबीयांसाठी वेळ काढत नात्यांमधील जिव्हाळा जपण्याला त्यांनी नेहमीच महत्त्व दिले आहे. “वय वाढते, जबाबदाऱ्या वाढतात; पण बहिणीच्या हातून राखी बांधून घेताना मन पुन्हा बालपणात जाते,” अशी भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. “माझ्या लाडक्या बहिणींच्या पाठीशी मी सदैव उभा” पालकमंत्री गुलाबराव पाटील पुढे म्हणाले, “आयुष्यात मला माझ्या सख्ख्या बहिणींच्या मायेबरोबरच सार्वजनिक आणि राजकीय जीवनात असंख्य माता-भगिनींचे प्रेम व आशीर्वाद लाभले. अनेकांनी मला मंत्री म्हणून नव्हे, तर आपल्या कुटुंबातील भाऊ म्हणून प्रेम दिले. हा विश्वास माझ्यासाठी कोणत्याही पदापेक्षा मोठा आहे. राखीचा प्रत्येक धागा मला या प्रेमाची आणि नात्याची जाणीव करून देतो. माझ्या सर्व लाडक्या बहिणींच्या सुख-दुःखात भाऊ म्हणून मी सदैव त्यांच्या पाठीशी उभा राहीन.” रक्षाबंधनाचा हा कौटुंबिक सोहळा केवळ परंपरेपुरता मर्यादित न राहता भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, विश्वास, आठवणी आणि संस्कारांची वीण अधिक घट्ट करणारा ठरला. यावेळी नगरसेवक आबा पाटील, राजेंद्र पाटील, मोतीआप्पा पाटील, नवलराजे पाटील यांच्यासह दोन्ही बहिणींच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते. दोन्ही बहिणींच्या घरी कुटुंबीय एकत्र आल्याने परिसरात आपुलकी आणि जिव्हाळ्याचे वातावरण निर्माण झाले होते. भाऊ-बहिणी आणि परिवारातील सदस्यांच्या या स्नेहपूर्ण भेटीने रक्षाबंधनाचा आनंद अधिकच द्विगुणित झाला.

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात बोदवडमध्ये १ सप्टेंबरला महामोर्चा

जन सम्राट टाईम्स

**बोदवड | प्रतिनिधी :** अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात तसेच आरक्षणाचा घटनात्मक हक्क अबाधित ठेवण्याच्या मागणीसाठी बोदवड येथे १ सप्टेंबर २०२६ रोजी विराट एल्गार महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, ता. बोदवड यांच्या वतीने हा महामोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा दुपारी १२ वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती, बोदवड येथून तहसील कार्यालयाकडे रवाना होणार आहे.

अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करू नये, आरक्षणाचा घटनात्मक हक्क अबाधित ठेवावा, तसेच अनुसूचित जाती-जमातींसाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळावा, या प्रमुख मागण्यांसाठी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधणार महामोर्चाच्या माध्यमातून अनुसूचित जाती समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे. आरक्षणाच्या हक्कासह समाजाच्या विविध मागण्यांसाठी मोठ्या संख्येने समाजबांधवांनी महामोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. “आरक्षण हा आपला घटनात्मक हक्क आहे.

तो अबाधित ठेवण्यासाठी एकजुटीने लढा देऊया,” असे आवाहन अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन आपली भूमिका शासनापर्यंत पोहोचवावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या महामोर्चाकडे बोदवड तालुक्यातील समाजबांधवांचे लक्ष लागले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थिनींना रोटरी क्लब ऑफ ईस्ट जळगावच्या वतीने सायकलीची भेट

## १३ गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप; शैक्षणिक प्रवास सुकर करण्याचा उपक्रम

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद। प्रतिनिधी :** रक्षाबंधनाच्या पर्वावर न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथील १३ गरजू विद्यार्थिनींना रोटरी क्लब ऑफ ईस्ट जळगावच्या वतीने सायकलींची अनोखी भेट देण्यात आली. शाळेत ये-जा करण्यासाठी विद्यार्थिनींचा वेळ वाचावा आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने रोटरी क्लबच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांपासून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहे. यापूर्वीही शाळेतील गरजू विद्यार्थिनींना रोटरी क्लबच्या माध्यमातून सायकलींचे वाटप करण्यात आले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू तसेच आई किंवा वडील अथवा दोन्ही पालक नसलेल्या विद्यार्थिनींची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली. सायकलींची भेट मिळाल्याने विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. रोटरी क्लबचे सदस्य कल्पेश छेडा यांनी रक्षाबंधनाच्या पर्वावर विद्यार्थिनींना ही सायकल भेट देण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच रोटरी क्लबचे सदस्य संजय गांधी यांनी विद्यार्थिनींनी सायकलींचा वापर प्रामुख्याने शैक्षणिक कामासाठी करावा, असे आवाहन केले. सायकलचा वापर झाल्यानंतर ती विकण्याऐवजी अन्य गरजू विद्यार्थिनीला देऊन या मदतीची साखळी पुढे सुरू ठेवावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. १३ विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप या उपक्रमांतर्गत प्रतीक्षा भोई, पायल राठोड, जानवी नाथ, चेतना माळी, ज्ञानेश्वरी कुंभार, यशस्वी पाटील, तेजल सोळंके, कोमल सोनवणे, तृप्ती गोसावी, दिपाली बारीला, भुवनेश्वर मानकरी, प्रज्ञा पगारे आणि समृद्धी इंगळे या विद्यार्थिनींना सायकली भेट देण्यात आल्या. या सायकलींमुळे विद्यार्थिनींचा शाळेत ये-जा करण्याचा वेळ वाचण्यास मदत होणार असून, त्यांच्या शिक्षणातील अडथळे कमी होण्यास हातभार लागणार आहे. मान्यवरांची उपस्थिती यावेळी रोटरी क्लबचे प्रेसिडेंट डॉ. मनोज चौधरी, सेक्रेटरी पूजा अग्रवाल, प्रोजेक्ट चेअरमन प्रीतम मुनोत, तसेच धीरज काबरा, नितेश जैन, कल्पेश छेडा, कौशल लोढा यांच्यासह नशिराबाद शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष योगेश पाटील, सचिव मधुकर चौबे, संचालक विनायक वाणी, राजेश पाटील, जनार्दन माळी, ॲड. प्रदीप देशपांडे उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका एस. ए. बनसोडे, उपमुख्याध्यापक ए. डी. चौधरी, पर्यवेक्षक एस. एन. पाचपांडे यांच्यासह सायकल भेट मिळालेल्या विद्यार्थिनींचे पालकही उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू पाचपांडे सर यांनी केले, तर आभार जी. टी. पाटील यांनी मानले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.रक्षाबंधनाच्या पर्वावर न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथील १३ गरजू विद्यार्थिनींना रोटरी क्लब ऑफ ईस्ट जळगावच्या वतीने सायकलींची अनोखी भेट देण्यात आली. शाळेत ये-जा करण्यासाठी विद्यार्थिनींचा वेळ वाचावा आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने रोटरी क्लबच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांपासून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहे. यापूर्वीही शाळेतील गरजू विद्यार्थिनींना रोटरी क्लबच्या माध्यमातून सायकलींचे वाटप करण्यात आले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू तसेच आई किंवा वडील अथवा दोन्ही पालक नसलेल्या विद्यार्थिनींची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली.

# अवैध धंद्यांविरोधात ॲड. पंकज गोरे यांचा एल्गार!

## आंदोलनस्थळी पत्त्यांचा डाव, सट्ट्याचे आकडे दाखवत प्रशासनाचे वेधले लक्ष विद्यार्थ्यांचा उपोषणाला पाठिंबा

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी :** धुळे शहरासह जिल्ह्यात वाढलेल्या अवैध धंद्यांना, नशेच्या पदार्थांच्या विक्रीला आणि वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने ॲड. पंकज गोरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या आंदोलनाला दुसऱ्या दिवशी नागरिकांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशासनाने अवैध धंद्यांविरोधात ठोस कारवाई करावी, या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनस्थळी ॲड. गोरे यांनी प्रतिकात्मक पत्त्यांचा डाव मांडून आणि सट्ट्याचे आकडे दाखवून प्रशासनाचे लक्ष वेधले. शहरात सट्टा-मटका, जुगार, अवैध दारूविक्री, गांजा, गुटखा तसेच अन्य नशेच्या पदार्थांची विक्री सुरू असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आला.

या अवैध धंद्यांमुळे तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत असून, त्याचा परिणाम कायदा व सुव्यवस्थेवर होत असल्याचा दावा ॲड. पंकज गोरे यांनी केला. पत्त्यांचा डाव मांडून अनोखे आंदोलन आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी ॲड. पंकज गोरे यांनी आंदोलनस्थळी पत्त्यांचा डाव मांडला. सट्ट्याचे आकडे दाखवत शहरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांचे प्रतिकात्मक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. पत्त्यांच्या क्लबमध्ये खेळले जाणारे विविध प्रकार दाखवत तरुणाईला अवैध धंद्यांच्या विळख्यात कसे ओढले जात आहे, याकडे त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. शहरात मटका, जुगार, झन्ना-मन्ना यांसारखे प्रकार सुरू असल्याचा आरोप करत त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच सट्टा व पत्त्यांचे क्लब नेमके कुणाच्या आश्रयाने सुरू आहेत, असा सवालही ॲड. गोरे यांनी उपस्थित केला. विद्यार्थ्यांचा आंदोलनाला पाठिंबा दरम्यान, मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी आंदोलनस्थळी दाखल झाले. त्यांनी उपोषणाला पाठिंबा देत प्रशासनाने अवैध धंदे आणि गुन्हेगारी प्रवृत्तींवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली.

कारवाई न झाल्यास शेकडो विद्यार्थ्यांसह उपोषणात सहभागी होण्याचा इशाराही विद्यार्थ्यांनी दिला. मनसेचे महानगरप्रमुख संजय सोनवणे यांनी पत्राद्वारे आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. एमडी ड्रग्सच्या विक्रीवरही कठोर कारवाईची मागणी गेल्या दीड ते दोन महिन्यांत पोलिसांनी शहरातील काही ठिकाणी कारवाई करून एमडी ड्रग्स जप्त केल्याबद्दल ॲड. गोरे यांनी पोलिसांचे स्वागत केले. मात्र, महाविद्यालय परिसरातही नशेच्या पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप करत तरुण पिढीच्या भवितव्याच्या दृष्टीने हा गंभीर प्रश्न असल्याचे त्यांनी सांगितले. एमडीसह अन्य नशेच्या पदार्थांच्या विक्रीवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. परराज्यातून महाराष्ट्रात येणाऱ्या गुटख्याची तस्करी धुळे जिल्ह्यातून होत असल्याचा आरोप करत केवळ वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई न करता या तस्करीमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. अवैध धंद्यांची ठिकाणे जाहीर करण्याचा दावा शहरातील अवैध धंद्यांची ठिकाणे जाहीर करण्याची घोषणा ॲड. पंकज गोरे यांनी आंदोलनाच्या पहिल्या दिवशी केली होती. त्यानुसार महात्मा गांधी पुतळ्याजवळील गोल पोलीस चौकी परिसर, प्रभाकर चित्रपटगृह परिसरातील नृसिंह मंदिराजवळ, विद्यावर्धिनी महाविद्यालय परिसर, शहर पोलीस ठाणे व बसस्थानक परिसर, चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याजवळील परिसर, देवपुरातील सप्तशृंगी मंदिर परिसर तसेच विविध शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात सट्टा क्लब, पत्त्यांचे क्लब, गांजा व अवैध दारूविक्री सुरू असल्याचे आरोप त्यांनी केले.

या ठिकाणी कारवाई होत नसल्याचा आरोप करत प्रशासनावर कारवाई न करण्यासाठी दबाव आणणाऱ्यांचाही आंदोलनातून निषेध करण्यात आला.

शनिवारी आमदार अनिल अण्णा गोटे आंदोलनस्थळी या आंदोलनाची प्रशासनाने दखल घेतली नाही तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा ॲड. पंकज गोरे यांनी दिला आहे. दरम्यान, शनिवार, २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता आमदार अनिल अण्णा गोटे आंदोलनस्थळी उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली. धुळे जिल्हा अवैध धंदे व गुन्हेगारीमुक्त करून कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला नागरिकांनी पाठिंबा द्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.

यावेळी पंकज भारस्कर, दिलीप चित्ते, सूरज भावसार, संदीप चौधरी, कार्तिक पाटील, संजय पाटील, बंटी गोरे, आप्पा लहामगे, गोपी सोनार, विशाल ढेकळे, सोनू मूर्तडकर, गोकुळ येलमामे यांच्यासह विद्यार्थी, तरुण आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.धुळे शहरासह जिल्ह्यात वाढलेल्या अवैध धंद्यांना, नशेच्या पदार्थांच्या विक्रीला आणि वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने ॲड. पंकज गोरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या आंदोलनाला दुसऱ्या दिवशी नागरिकांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशासनाने अवैध धंद्यांविरोधात ठोस कारवाई करावी, या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनस्थळी ॲड. गोरे यांनी प्रतिकात्मक पत्त्यांचा डाव मांडून आणि सट्ट्याचे आकडे दाखवून प्रशासनाचे लक्ष वेधले.

# पळासखेडे-रूपनगर वि.का.सोसायटीत ठरावावरून वाद; सचिवावर फसवणुकीचा आरोप

## सभा रद्द झाल्याची घोषणा केल्यानंतर परस्पर ठराव मंजूर केल्याचा दावा; गुन्हा दाखल करण्याची संचालक व सभासदांची मागणी

जन सम्राट टाईम्स

**भडगाव | (प्रतिनिधी):** पळासखेडे-रूपनगर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीमध्ये बँक प्रतिनिधी निवडीच्या ठरावावरून वाद निर्माण झाला आहे. सभा सुरू असताना झालेल्या वादावादीमुळे बैठक रद्द करून दोन दिवसांनंतर नव्याने सभा घेण्याचे जाहीर करण्यात आले असताना, काही संचालकांनी सोसायटीच्या कार्यालयात जाऊन परस्पर ठराव मंजूर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सोसायटीचे सचिव व संबंधित संचालकांविरोधात चौकशी करून निलंबनाची कारवाई तसेच फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी प्रकाश वंजारी, हरी दुधा वंजारी यांच्यासह संचालक व सभासदांनी केली आहे. पळाखेडे-रूपनगर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीअंतर्गत बँक प्रतिनिधी निवडीसाठी नवीन ठराव मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू होती. संस्थेची थकबाकीची स्थिती असल्याने कार्यरत संचालक मंडळाला त्यांच्या स्तरावर ठराव करता येत नसून, संबंधित ठराव सभासदांमधून मंजूर करण्याचा निर्णय झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. गोंधळामुळे सभा रद्द; दोन दिवसांनी पुन्हा बैठक घेण्याचे ठरले ठरावावरून सभेत वादावादी आणि गोंधळ निर्माण झाल्याने सचिव व चेअरमन यांनी सभा रद्द केल्याची घोषणा केली. तसेच दोन दिवसांनंतर नव्याने सभा घेऊन बँक प्रतिनिधीचा ठराव मंजूर करण्यात येणार असल्याचे उपस्थित संचालक व सभासदांना सांगण्यात आले. पोलिसांच्या उपस्थितीत सर्वांना घरी जाण्यास सांगण्यात आल्याचा दावाही करण्यात आला आहे. मात्र, त्यानंतर काही संचालकांनी गुपचूप सोसायटीच्या कार्यालयात प्रवेश करून कार्यालयाचे दार बंद केले आणि आपल्या पसंतीच्या सभासदाच्या नावाचा ठराव मंजूर केल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. हा ठराव नियमबाह्य पद्धतीने मंजूर करून तत्काळ भडगाव सहाय्यक निबंधक कार्यालयात सादर करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सचिवाविरुद्ध फौजदारी कारवाईची मागणी सभा रद्द झाल्याची घोषणा करून दोन दिवसांनी नव्याने बैठक घेण्याचे ठरले असताना परस्पर ठराव मंजूर करून तो सहाय्यक निबंधक कार्यालयात सादर केल्याने सभासदांची फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची सहकार विभागाने सखोल चौकशी करावी, संबंधित सचिवावर कारवाई करावी आणि पोलिसांच्या साक्षीने फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी संचालक व सभासदांनी केली आहे. तसेच ठरल्याप्रमाणे दोन दिवसांच्या कालावधीत नव्याने सभा घेऊन बँक प्रतिनिधी निवडीचा ठराव करण्यात यावा. अन्यथा संबंधितांविरुद्ध पोलिसांमार्फत फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येईल, असा इशारा प्रकाश वंजारी, हरी दुधा वंजारी यांच्यासह इतर संचालक व सभासदांनी दिला आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे पळासखेडे-रूपनगर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला. असून, सहकार विभाग या तक्रारीची दखल घेऊन नेमकी कोणती कारवाई करतो, याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे.

# गोपीचंद पुना पाटील विद्यालयात 'सजीव राखी'चा अनोखा उपक्रम

## ४० विद्यार्थ्यांना मिळाली बहिणीची माया; २५ विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना मानले भाऊ

जन सम्राट टाईम्स



**भडगाव | प्रतिनिधी :** कोळगाव रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला तालुक्यातील गोपीचंद पुना पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात 'सजीव राखी'चा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्या बांधत रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण तसेच भावनिक वातावरणात साजरा केला. या उपक्रमातून प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, परस्पर सन्मान आणि सहकार्याचा सुंदर संदेश देण्यात आला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि भारतीय संस्कृती व परंपरांविषयी आदर निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य आर. आर. वळखंडे होते. यावेळी विद्यार्थीनींनी प्राचार्यांसह शिक्षकांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा आनंद साजरा केला. ४० विद्यार्थ्यांना मिळाली बहिणीची माया विद्यालयातील ज्या सुमारे ४० विद्यार्थ्यांना सख्ख्या बहिणी नाहीत, अशा विद्यार्थ्यांना विद्यालयातील विद्यार्थीनींनी राखी बांधून बहिणीच्या प्रेमाची उणीव भरून काढली. त्याचप्रमाणे ज्या २५ विद्यार्थिनींना भाऊ नाही, त्यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना भाऊ मानून त्यांच्याकडून राखी बांधून घेतली. त्यामुळे या उपक्रमाला भावनिक आणि सामाजिक स्वरूप प्राप्त झाले. रक्षाबंधनातून संस्कार आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश यावेळी विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाची परंपरा, त्यामागील सांस्कृतिक व भावनिक महत्त्व तसेच रक्षाबंधनाची विधीवत पद्धत याबाबत माहिती देण्यात आली. भाऊ-बहिणीचे नाते प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि परस्पर संरक्षणाचे प्रतीक असून, प्रत्येक भावाने बहिणीचा आदर व सन्मान करावा आणि तिच्या सुख-दुःखात सदैव साथ द्यावी, असा संदेश देण्यात आला.

# बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त युवासेनेचा उपक्रम

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून युवासेना धुळे जिल्ह्याच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत विशेष मुलींसोबत रक्षाबंधनाचा पवित्र सण साजरा करण्यात आला. बहीण-भावाच्या प्रेम, जिव्हाळा आणि संरक्षणाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण समाजातील विशेष घटकांसोबत साजरा करण्याचा उपक्रम युवासेनेने राबविला. धुळे येथील श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह येथे हा कार्यक्रम उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. यावेळी युवासेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष मुलींकडून राखी बांधून घेतली. तसेच त्यांना मिठाई, दैनंदिन उपयोगाचे साहित्य आणि शैक्षणिक व खेळाचे साहित्य भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे बालगृहातील मुलींच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. समाजातील उपेक्षित व विशेष घटकांशी आपुलकीचे नाते निर्माण करून त्यांना सणाच्या आनंदात सहभागी करून घेणे, हा या उपक्रमामागील उद्देश होता. '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' या बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संचालक सुनील वाघ, निखिल वाघ तसेच संस्थेतील कर्मचारी यांनी सहकार्य केले. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे, जयेश फुलपगारे, अविनाश जोंधळे, तरबेज शेख, गोपाळ चव्हाण, सुमित चौधरी, विकास पाटील, सोमेश कानकाटे, गोलू लहामगे, जाकीर शेख, सर्वेश थोरात, जयेश नाईक, दीपक सोनटक्के, हर्षवर्धन पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून युवासेना धुळे जिल्ह्याच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत विशेष मुलींसोबत रक्षाबंधनाचा पवित्र सण साजरा करण्यात आला. बहीण-भावाच्या प्रेम, जिव्हाळा आणि संरक्षणाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण समाजातील विशेष घटकांसोबत साजरा करण्याचा उपक्रम युवासेनेने राबविला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# दोंडाईचा शहरात ईदचा भव्य जुलूस; सामाजिक सलोखा अन् बंधुभावाचा संदेश

## मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त उत्साहात मिरवणूक; विविध मान्यवरांकडून स्वागत

जन सम्राट टाईम्स



**दोंडाई | प्रतिनिधी:** दोंडाईचा शहरात प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर (स.अ.) यांच्या जयंतीनिमित्त ईद-ए-मिलादुन्नबीचा भव्य जुलूस उत्साहपूर्ण आणि शांततेच्या वातावरणात पार पडला. मानवतेला शांतता, सत्य, दया, समता आणि बंधुभावाचा संदेश देणाऱ्या पैगंबर साहेबांच्या विचारांचे स्मरण करत मुस्लिम बांधवांनी या मिरवणुकीत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. विविध धर्मीय नागरिकांच्या सहभागामुळे या सोहळ्यात सामाजिक सलोखा आणि एकतेचे सुंदर दर्शन घडले. नूरानी मशिदीचे मौलाना मुफ्ती हजरत जियाऊद्दीन साहेब यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून जुलूसचा प्रारंभ करण्यात आला. सकाळी ८.३० वाजता जामा मशिदीपासून मिरवणुकीला सुरुवात झाली. भोगावती नदीचा पूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, अभिषेक चित्रमंदिर, होळी चौक, आझाद चौक, वीर शिरोमणी महाराणा प्रताप पुतळा, अमरावती नदी, नूरानी मशीद, शहीद अब्दुल हमीद चौक, ईबू बोहरी यांचे दुकान, सेंट्रल बँक व देवरे बिल्डिंगमार्गे जुलूस पुन्हा नूरानी मशीद, अमरावती नदी, गढी परिसर आणि मुन्ना चौकातून जामा मशिदीजवळ पोहोचला. येथे सलातो-सलाम व फातेहा ख्वानीनंतर मिरवणुकीची सांगता करण्यात आली. तसेच माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक बापूसाहेब रवींद्र देशमुख, माजी नगराध्यक्ष विक्रम पाटील, नगरसेवक रामभाऊ माणिक, नगरपरिषदेचे गटनेते निखिल राजपूत, बांधकाम सभापती बबलू देवरे, नगरसेवक प्रवीण महाजन, जितू गिरासे, विजय मराठे, रवी जाधव, भरतरी ठाकूर, कृष्णा नगराळे, महेंद्र गिरासे, महेंद्र पाटील आणि मनोज धनगर यांच्यासह विविध मान्यवरांनी मिरवणुकीचे स्वागत करून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. पोलिसांचा चोख बंदोबस्त जुलूस शांततेत पार पडावा यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष नियोजन करत चोख बंदोबस्त ठेवला होता. शिरपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील, दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे, एपीआय संजय बच्छाव, पीएसआय इम्रान खान, पीएसआय नकुल कुमावत, पीएसआय दहिफळे तसेच गोपनीय विभागाचे अविनाश पाटील यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी मिरवणुकीवर विशेष लक्ष ठेवत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवली. आयोजकांच्या परिश्रमातून भव्य आयोजन जुलूसच्या यशस्वी आयोजनासाठी जामा मशिदीचे चेअरमन हाजी सुलतान, नूरानी मशिदीचे समसोद्दीन शेख, हाजी अब्दुल गफ्फार मन्सुरी, हाजी सिराजुद्दीन शेख, धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष नाजीम शेख यांच्यासह असलम बागवान, इक्बाल बागवान, रफिक शाह, फारूक मुनीर, जलील मण्यार, पत्रकार मंजुम पठाण, मोहसीन सिराज शेख, जुबेर शेख, आझम कुरेशी, शाकीर लोहार, रईस शेख, मोहसीन पठाण, पत्रकार वसीम खाटीक, युनूस खान, साबीर शाह, मोहसीन मोमीन, शाहरुख शेख, मोमीन शेख, रऊफ शाह, अली असगर बागवान, आसिफ बागवान, ईरफान बागवान, पत्रकार अख्तर शाह, दगा पेंटर, कालू शाह यांच्यासह मुस्लिम समाजातील युवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# मूकबधिर विद्यालयात रक्षाबंधन सोहळा उत्साहात!



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी :** के.जी.गुजराथी मूकबधिर निवासी विद्यालय, धरणगाव येथे २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचा सण अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावूक वातावरणात साजरा करण्यात आला. बोलता येत नसले तरी चेहऱ्यावरील आनंद, हावभाव आणि डोळ्यांतील जिव्हाळ्यातून बहीण-भावाच्या पवित्र नात्याचे सुंदर दर्शन घडले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थिनींनी आपल्या भावांच्या कपाळावर टिळा लावून त्यांच्या मनगटावर राखी बांधली आणि औक्षण केले. भावांनीही आपल्या बहिणींना संरक्षणाचे वचन देत भेटवस्तू देऊन त्यांचा आनंद द्विगुणित केला. पर्यावरणपूरक राख्यांनी वेधले लक्ष विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांचा वापर रक्षाबंधनासाठी केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. शब्दांची देवाणघेवाण शक्य नसली तरी विद्यार्थ्यांनी सांकेतिक भाषा आणि हावभावांच्या माध्यमातून एकमेकांप्रती असलेले प्रेम, आपुलकी आणि आदर व्यक्त केला. हा भावनिक क्षण उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "नात्याला कोणत्याही भाषेची गरज नसते, हे या मुलांनी आज दाखवून दिले आहे,"